निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २१८ वा.
शनिवार -११ ऑक्टोबर २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## ३ नराधम आले दिवसाढवळ्या १४ वर्षीय मुलीच्या तोंडावर स्प्रे मारला अन्...थरारक घटनेनंतर पोलिसांनी...

**बुलढाणा/** विदर्भातील बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर ते मोताळा रोडवर दिवसाढवळा धक्कादायक घटना घडली आहे. दिवसाढवळ्या एका १४ वर्षीय शाळेकरी मुलीचे अपहरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. ३ नराधम स्विफ्ट कारमधून आले आणि त्यांनी अपहरणाच्या उद्देशाने १४ वर्षीय शाळेकरी मुलीच्या चेहऱ्यावर स्प्रे मारला. तिला बेशुद्ध करुन तिला बळजबरी कारमध्ये अपहरण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

पण परिसरातील नागरिकांच्या सतर्कतेमुळे आरोपींचा डाव फसला आहे. डाव फसल्यानंतर नराधमांनी तिथून पळ काढला पण नागरिक आणि पोलिसांच्या सर्तकतेमुळे बुलढाण्याच्या दिशेने निघालेल्या कारचा पाठलाग करत मोताळा इथे अपहरणकर्त्यांची कार अडवून त्यांना अटक करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, काही अज्ञात आरोपींनी रस्त्यावरून जाणाऱ्या १४ वर्षांच्या अल्पवयीन मुलीला गाठले. तिला बेशुद्ध करण्याच्या उद्देशाने त्यांनी तिच्या तोंडावर स्प्रे मारला आणि जबरदस्तीने कारमध्ये बसवण्याचा प्रयत्न केला. घटनास्थळावर उपस्थितीत लोकांनी सांगितलं की, १४ वर्षीय विद्यार्थिनीसह तीन शालेय विद्यार्थ्यांचे अपहरणाचा हा प्रयत्न होता. ही घटना शहरात सकाळी साडेआठ वाजताच्या सुमारास मलकापूर शहरात घडली.

हा अपहरणाचा प्रयत्न सुरू असतानाच स्थानिक नागरिकांच्या ही गोष्ट लक्षात आली. नागरिकांनी तात्काळ तत्परता दाखवत आरोपींच्या कारचा पाठलाग केला. पाठलागानंतर जमावाने या तिन्ही आरोपींना पकडले. यावेळी संतप्त जमावाने त्यांना चांगलाच चोप दिला, तसंच त्यांच्या कारची तोडफोड केली. सिनेस्टाइल अपहरण आणि त्यानंतरच्या थरारामुळे जिल्ह्यात एकच खळबळ माजली आहे.



मारहाणीनंतर नागरिकांनी या आरोपींना बोरखेडी पोलिसांच्या स्वाधीन केले. प्राथमिक माहितीनुसार, पकडलेल्या ३ आरोपींपैकी २ जण बीड जिल्ह्यातील, तर १ आरोपी उत्तर प्रदेशातील आहे.

अपहरण नेमके कोणत्या उद्देशाने करण्यात येत होतं, यामागचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

## मुंबईसह ठाणे आणि पुणे जाम होणार; फडणवीस सरकारला थेट नागपुरातून इशारा

**नागपुर/**....तर मुंबईसह ठाणे आणि पुणे जाम होणार; फडणवीस सरकारला थेट नागपुरातून इशारा, 'दम असेल तर महाराष्ट्रात...' महायुती सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयामुळे राज्यातील ओबीसी समाज अस्वस्थ झाला आहे. हा शासन निर्णय सरकारने रद्द करावा. नागपुरातील महामोर्चा फक्त झाँकी आहे. ओबीसींकडे दुर्लक्ष केल्यास मुंबईच नव्हे तर पुणे, ठाणे जाम करू, असा इशारा ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनी दिला आहे. नागपुरात आयोजित महामोर्चात त्यांनी हा इशारा दिला. ओबीसी मधील ३७४ जातींनी पण या सरकारला कौल दिला आहे, हे सरकार ते विसरले आहे म्हणून ओबीसींवर अन्याय सुरू आहे अशी टीकाही त्यांनी केली.

राज्यातील सकल ओबीसी समाजाच्या वतीने शुक्रवारी नागपुरातील लाखोंच्या संख्येने यशवंत स्टेडियमवरून महामोर्चा निघाला. संविधान चौकात मोर्चा आल्यानंतर सभेत रुपांतर झाले. यात समाजबांधवांना आवाहन करताना वडेट्टीवार म्हणाले, मराठा आरक्षणासाठी सरकारने २ सप्टेंबर रोजी काढलेल्या शासन निर्णयानंतर मराठवाड्यात दररोज हजारो प्रमाणपत्रांचे वाटप सुरू आहे. यामुळे राज्यात ओबीसी तरुणांचे आत्महत्यांचे सत्र सुरू झाले आहे. फक्त जरांगे यांच्या भरवश्यावर महायुती सरकार आले आहे का? ओबीसी मधील ३७४ जातींनी पण या सरकारला कौल दिला आहे, हे सरकार ते विसरले आहे म्हणून ओबीसींवर अन्याय सुरू आहे. सरकारच्या या शासन निर्णयामुळे ओबीसींच्या मानेवर सुरी फिरणार आहे. त्यामुळे सरकारने आताच आपली भूमिका सुधारावी नाहीतर मुंबईच नाही तर ठाणे आणि पुणे जाम करू.




**'ही ओबीसींच्या अस्तित्वाची लढाई'**

सरकारचा डीएनए ओबीसींचा असेल तर हा शासन निर्णय रद्द करून तुमचा डीएनए सिद्ध करा. ओबीसी समाजात आता मराठा समाज घुसत आहे. तो समाज पैलवान आहे. हिंद केसरी असलेला मराठा समाज, दुसरीकडे ओबीसी समाज हा कुपोषित आहे. त्यांच्यासमोर ओबीसी कसा टिकणार? म्हणूनच ही ओबीसींच्या अस्तित्वाची लढाई, असल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

**'...तर तेलंगणा सरकारप्रमाणे ४२ टक्के आरक्षण द्या'**

एकीकडे सरकार म्हणत आहे ओबीसी आरक्षणाला धक्का लागणार नाही दुसरीकडे ओबीसी मध्येघुसखोरी आहे. सरकारमध्ये दम असेल तर तेलंगणा सरकारप्रमाणे ४२ टक्के आरक्षण देण्यात यावे अशी मागणी वडेट्टीवार यांनी मोर्चात केली.

**'आम्ही मराठा समाजाच्या विरोधात नाही'**

आम्ही मराठा समाजाच्या विरोधात नाही. मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. जेव्हा मराठा समाजाला ईडब्ल्यूएसचे आरक्षण मिळाले तेव्हा आम्हीच पाठिंबा दिला. स्वतंत्र आरक्षण मराठा समाजाला दिले पाहिजे पण ओबीसीं मधूनच आरक्षण पाहिजे हा अट्टाहास आहे. त्याला आमचा विरोध आहे. ओबीसी समाजातील लोकांना एक प्रमाणपत्र मिळवण्यासाठी वर्ष लागते इथे मराठा समाजाला एक तासात प्रमाणपत्र दिली जात आहे हा अन्याय नाही का? आम्ही कोणाच्या धमक्यांना घाबरत नाही. आम्ही लढत राहणार, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

**सभेत सहकारमंत्र्यांचा घेतला समाचार**

मराठवाड्यात अतिवृष्टीने शेतकरी हवालदिल झाला आहे. असं असताना या सरकारमधील सहकारमंत्री म्हणतो शेतकऱ्यांना कर्जमाफीची सवय लागली आहे. आम्ही निवडणुकीत आश्वासन देत असतो यातून सरकारची खरी नियत दिसत आहे. हे सरकार समाज समाजात भांडण लावत आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांना भिकेला लावत आहे. यांना शेतकरीच जागा दाखवेल, अशी टीका यावेळी वडेट्टीवार यांनी केली.

## स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य करार
## जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर' नागपुरात उभारण्यात येणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई** / नागपुरात सर्व सोयी सुविधायुक्त जागतिक दर्जाचे 'कन्व्हेन्शन सेंटर' उभारण्यात येणार आहे. याबाबत स्पेन येथील फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसमवेत वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत आज सामंजस्य करार करण्यात आला.

नागपूरला उभारण्यात येणारे 'कन्व्हेन्शन सेंटर' साठी निवडण्यात येणारी जागा सर्व परिवहन सेवांनी उत्तमरित्या जोडलेली असावी, अशी सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

यावेळी स्पेनचे भारतातील राजदूत जुआन अँटेनियो, फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, पायोनियर एक्झिबिशन अँड कॉन्व्हेन्शन प्रायव्हेट लिमिटेडचे अध्यक्ष मुकेश अरोरा आणि उपाध्यक्ष जीत अरोरा, नागपूर जिल्हाधिकारी विपिन इटनकर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नागपुरात प्रस्तावित असलेले कन्व्हेन्शन सेंटर केवळ प्रदर्शने, कार्यक्रम आदींसाठी उपयोगात येणारे नसावे, तर सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनासाठी हक्काचे व्यासपीठ असावे. नागपूरचा इतिहास 'कन्व्हेन्शन सेंटर' च्या माध्यमातून येथे आलेल्या प्रत्येकाला कळावा, अशा पद्धतीने कन्व्हेन्शन सेंटरची अंतर्गत रचना असावी. हे सेंटर अत्यंत आकर्षक, आधुनिक तंत्रज्ञानानेयुक्त आणि पर्यावरण पूरक वास्तूचे मूर्तिमंत उदाहरण ठरावे. स्पेनचे राजदूत म्हणाले, भारताचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि स्पेनचे प्रधानमंत्री पेड्रो सांचेझ यांच्यात चांगले संबंध आहेत. यामुळे दोन्ही देशातील द्विपक्षीय संबंध आणखी मजबूत होत आहे. भारत कृत्रिम बुद्धिमत्ता, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सामान्य नागरिकाच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणत असून याची दखल जगाने घेतली आहे. मुंबई हे भारताचेच नव्हे, तर दक्षिण आशियाचे 'पावर हाऊस' बनत आहे. त्यामुळे मुंबई राजधानी असलेल्या महाराष्ट्रसोबत नक्कीच स्पेनला काम करायला आवडेल, अशा शब्दात त्यांनी महाराष्ट्राचा गौरव केला. फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीच्यावतीने मुख्य कार्यकारी अधिकारी रिकार्ड झेपाटेरो यांनी सादरीकरण केले.



यावेळी जिल्हाधिकारी नागपूर आणि फिरा बार्सिलोना इंटरनॅशनल कंपनीसोबत सामंजस्य कराराचे आदान प्रदान करण्यात आले.

## डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्याचे शासनाचे निर्देश

**मुंबई,/** वाचन संस्कृती वाढीस लागावी, तसेच मराठी भाषेचा प्रचार, प्रसार, विकास, जतन आणि संवर्धन व्हावे, या उद्देशाने माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीदिनी म्हणजे १५ ऑक्टोबर रोजी 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. 'घेऊया एकच वसा, मराठीला बनवूया ज्ञानभाषा' ही यावर्षीच्या उपक्रमाची मध्यवर्ती संकल्पना आहे.

राज्य शासनाचे सर्व मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम, सर्व आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकारी कार्यालये हे 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणार आहेत. यामध्ये ऑनलाईन तसेच प्रत्यक्षरित्या कार्यक्रम आयोजित करण्यात येतील. वाचन प्रेरणा दिनानिमित्त केवळ ललित साहित्यापुरते कार्यक्रम मर्यादित न ठेवता, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यवस्थापन, पर्यावरण, आरोग्य, संगणक, अवकाश विज्ञान विषयांचा समावेश कार्यक्रमात करण्यात येणार असून जास्तीत जास्त तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी रोजगाराभिमुख उपक्रम राबविण्यात येतील. यात अनुवाद लेखन, व्यावसायिक लेखन, ई-बुक, स्व-प्रकाशन, ऑनलाईन पुस्तक विक्री, संहिता लेखन, शॉर्ट फिल्म/डॉक्युमेंटरी लेखन यासारख्या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहे. त्याचबरोबर, व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामूहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन, आणि 'मराठी वाचन कट्टा' ची निर्मिती, मराठी आभासी /प्रत्यक्ष साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. मराठी भाषेचा वापर जास्तीत जास्त व्हावा, या उद्देशाने न्यायव्यवहार, शासन प्रशासन, प्रसार माध्यमे इत्यादी ठिकाणी होणाऱ्या मराठी भाषेच्या वापराबाबत जागरूकता वाढविण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.




या कार्यक्रमांच्या आयोजनासाठी महाराष्ट्र साहित्य परिषद, मराठवाडा साहित्य परिषद, विदर्भ साहित्य संघ, कोकण मराठी साहित्य परिषद, दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा आणि मुंबई मराठी साहित्य संघ यासारख्या साहित्य संस्थांची मदत घेतली जाणार आहे. ग्रंथालये, महाविद्यालये, तंत्रमहाविद्यालये, पदविका संस्था या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील संबंधित संस्था देखील वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करणार आहेत. त्याचबरोबर महापालिका/नगरपालिका यांच्या अखत्यारितील संस्था देखील विविध कार्यक्रमांचे आयोजन करणार आहेत, असे मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी सांगितले आहे.

## अतिवृष्टीमुळे पैठण - रहाट गाव जुन्या रस्त्यावरील शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान

पैठण प्रतिनिधी/बबन उदावंत

शेतकऱ्यांच्या शेतीच्या आजूबाजूने जाणारा पैठण राहाटगाव जुना रस्ता वरील शेती आणि रस्ता अतिवृष्टी पाण्यामुळे कामाटीच्या शेतातील पिकासह जमीन वाहून गेली आहे अशीच अवस्था शेजारी असलेल्या शेतकऱ्यांची झाली असून ओढ्यातील पाण्यामुळे व नाथासागारातून पाणी सोडल्यामुळे प्रचंड नुकसान झाले असल्यामुळे शेतकरी हैराण झाले आहेत राहाटगाव ते पैठण जुना रस्त्यावर काही शेतकऱ्यानी अतिक्रमणी केले असल्यामुळे रस्ता लहान झाला असुन याठिकाणी पंचनामा करण्यात आलेला नाही तरी सदरील तहसील प्रशासनाने ताबडतोब पंचनामे करून आर्थिक मदत करावी अशी मागणी बाधित शेतकऱ्यांनी केली आहे .

सद्यस्थितीत ओढ्यात पानी असलेल्या मुळे शेतकऱ्यांचे जाणे येणे थांबले असून ते त्रस्त झाले आहेत. पोटे,महाजन, खेडकर, वडेकर, गारदे, झांजे, कामाटी, अवधूत, ठानगे, गव्हाणे, सारीक, चाटुपळे, वाव्हळ, सव्वाशे, मानमोडे, नाईक, पोकळे आदी शेतकऱ्यांना जाने येने थांबले असून प्रचंड नुकसान झाले आहे.



# महानायकाचा वाढदिवस....

आज ११ ऑक्टोबर हिंदी चित्रपटसृष्टीचा शहेनशहा, महानायक अमिताभ बच्चन यांचा वाढदिवस. ११ ऑक्टोबर १९४२ रोजी उत्तरप्रदेशातील अलाहाबाद येथे जन्मलेल्या अमिताभ यांच्या वडिलांचे ( हरिवंशराय बच्चन ) मूळ आडनाव श्रीवास्तव असले तरी ते बच्चन या टोपणनावाने कविता प्रसिद्ध करीत त्यामुळे अमिताभ यांनीही चित्रपट सृष्टीत आल्यावर बच्चन हेच टोपणनाव आडनाव म्हणून वापरण्यास सुरवात केली. पुढे संपूर्ण कुटुंबाचेच बच्चन हेच आडनाव व्यवहारात रूढ झाले. अमिताभ बच्चन यांचे शालेय शिक्षण अलाहाबाद येथील ज्ञानप्रबोधिनी आणि बॉईज हायस्कूल येथे झाले. दिल्लीच्या किरोडीमल महाविद्यालयातून त्यांनी विज्ञानाची पदवी घे-तली त्यानंतर काहीकाळ त्यांनी कोलकाता येथे एका कंपनीत काम केले पण तिथे त्यांचे मन रमले नाही तेथून ते मुंबईत आले आणि चित्रपटात कामाच्या संधी शोधू लागले. अमिताभ बच्चन यांना ख्वाजा अहमद अब्बास यांच्या सात हिंदुस्थानी या चित्रपटात संधी मिळाली. दुर्दैवाने हा चित्रपट चालला नाही. अमिताभ यांचाही म्हणावा तसा प्रभाव पडला नाही. अमिताभ बच्चन यांनी हिंदी चित्रपट सृष्टीत पदार्पण केले तेंव्हा देव आनंद, शम्मी कपूर, राजेश खन्ना, विनोद खन्ना, जितेंद्र, धर्मेद्र, शशी कपूर अशा देखण्या नायकाची चलती होती. अशा काळात अमिताभ तग धरतील का ? अशी साशंकता होती त्यात त्यांच्या पहिलाच चित्रपट जोरदार आपटला मात्र त्यांनी हार मानली नाही. सलग सात चित्रपट आपटूनही ते डगमगले नाही. १९७३ साली आलेल्या प्रकाश मेहरा दिग्दर्शित जंजीर या चित्रपटाने अमिताभ यांना खरा ब्रेक मिळवून दिला. या चित्रपटातील पोलीस इन्स्पेक्टरची त्यांची भूमिका खूप गाजली. या चित्रपटानंतर त्यांची अँग्री यंग मॅन अशी जनमानसात प्रतिमा निर्माण झाली. प्रचलित समाजव्यवस्थेच्या विर-ोधात बंडखोरी व क्रोध व्यक्त करणाऱ्या युवकांचे प्रतिनिधित्व त्यांनी पडद्यावर साकारले त्यामुळेच त्यांच्या भूमिका प्रेक्षकांना आपल्याशा वाटल्या. उंच शरीरयष्टी, भेदक डोळे, भारदस्त आवाज आणि अनोखी अभिनय शैली यामुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवले. ते लवकरच सुपरस्टार पदावर पोहचले. दिग्दर्शक ऋषिकेश मुखर्जी यांच्या आनंद चित्रपटात त्यांना सुपरस्टार राजेश खन्ना यांच्यासमवेत काम करण्याची संधी मिळाली. या संधीचे त्यांनी सोने केले. त्यावर्षीचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा फिल्मफेअर पुरस्कार त्यांना मिळाला. नमक हराम या चित्रपटातील त्यांची भूमिकाही लक्षवेधी ठरली. ७० आणि ८० चे दशक अमिताभ बच्चन यांनी अक्षरशः गाज-वून सोडले. दिवार, शोले, अभिमान, कभी कभी, अमर अकबर अँथनी , मुक्कदर का सिकंदर, त्रिशूल, डॉन, काला पथर, नशीब, लावरीस, सिलसिला, नमक हलाल, कुली, शराबी, खुद्दार, अग्निपथ असे एकापेक्षा एक सुपरहिट चित्रपट त्यांनी दिले. अमिताभ बच्चन यांच्या इतकी लोकप्रियता आजतागायत कोणत्याही अभिनेत्याला लाभलेली नाही. अमिताभ बच्चन हे त्यांच्या काळातील सर्वाधिक मानधन घेणारे अभिनेते होते. त्यांनी आजवर २०० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. त्यांनी काही चित्रपटात पार्श्वगायनही केले. मिस्टर नटवरलाल चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना फिल्मफेअरचा पुरस्कारही मिळाला होता. १९८४ साली त्यांनी राजकारणात प्रवेश केला मात्र हा आपला प्रांत नाही हे लक्षात येताच त्यांनी राजकारणाला रामराम केला. १९८२ साली कुली चित्रपटाच्या शूटिंगच्या वेळी अपघात होऊनही करोडो चाहत्यांच्या आशीर्वादाने अमिताभ पुन्हा एकदा उभे राहिले. १९९६ साली अमिताभ बच्चन कॉर्पोरेशन लिमिटेड ही कंपनी त्यांनी स्थापन केली. मात्र लवकरच त्यांना ती बंद करावी लागली या दरम्यान त्यांना मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागले. हे आर्थिक नुकसान भरून काढण्यासाठी त्यांनी दूरचित्रवाणीवरील कौन बनेगा करोडपती या मालिकेचे सूत्रसंचालन करण्यास सुरुवात केली. कौन बनेगा करोडपती ही प्रश्नमंजुषा देखील त्यानी यशस्वी केली. आज ते वयाची ८३ वर्ष पूर्ण करत असले तरी तरुणांना लाजवेल असा त्यांचा उत्साह आहे. अमिताभ बच्चन यांच्यासारखा प्रतिभावान कलाकार युगातून एकदाच जन्माला येतो. त्यांच्यासारखा अभिनेता भारतातच नव्हे तर जगात झाला नाही आणि पुढे देखील होणार नाही. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देतानाच त्यांना दीर्घायुष्य लाभो अशी ईश्वर चरणी प्रार्थना करतो. अमिताभ बच्चन यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

# *भारतातील बाललैंगिक गुणोत्तर - 1000 मुलांमागे फक्त ९२९ मुली*

दरवर्षी ११ ऑक्टोबर हा दिवस आंतरराष्ट्रीय बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवसाचे मुख्य उद्दिष्ट मुलींच्या हक्कांबद्दल जागरूकता निर्माण करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता यासारख्या मूलभूत सुविधांचा लाभ मिळवून देणे आणि समाजातील लिंगसमानतेची स्थिती सुधारण्याकडे लोकांचे लक्ष वेधणे हे आहे. मात्र, या उत्सवाच्या पार्श्वभूमीवर भारतातील मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील गंभीर असमानता चिंतेचा विषय ठरते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (छत्रत्रड-५, २०१९-२१) नुसार भारतात जन्मावेळी लिंग गुणोत्तर, म्हणजेच प्रत्येक १,००० मुलांमागे जन्मलेल्या मुलींची संख्या फक्त ९२९ इतकी आहे. ही संख्या नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तराच्या (९५२ मुली प्रति १,००० मुले) तुलनेत खूपच कमी आहे. ही विकृती फक्त आकडेवारीवर आधारित समस्या नाही, तर समाजातील मुलींबाबत असलेले मानसिक, सामाजिक आणि सांस्कृतिक भेद स्पष्ट करते.

नैसर्गिक गर्भलिंग गुणोत्तर साधारणतः ९५२ मुली प्रति १,००० मुले असते, हे नैसर्गिक प्रक्रिया आणि जैविक घटकांच्या परिणामस्वरूप तयार होते. मात्र भारतातील मुलींच्या जन्मातील घट ही समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून गंभीर समस्या आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा लिंगभेद, सामाजिक अपेक्षा, मुलींबाबतच्या आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनाशी निगडीत आहे. काही भागांत मुलींचे जीवन कमी महत्त्वाचे मानले जाते, मुलींचे शिक्षण, आरोग्य आणि पोषण यामध्ये पुरुषांच्या तुलनेत कमी गुंतवणूक केली जाते, त्यामुळे मुलींचा दर्जा सामाजिकदृष्ट्या कमी होतो.

भारतामध्ये मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येतील घटाचे कारण बहुप्रकारे आहे. सर्वप्रथम, लिंग निवडीच्या प्रथांचा विचार करता येतो. गर्भधारणेदरम्यान मुलींचे लिंग ठरवून, गर्भपात करून किंवा मुलींचा जन्म टाळण्याच्या प्रथांमुळे जन्मावेळी मुलींच्या संख्येत घट होते. लिंग निवडीच्या प्रथा, ज्या मुलींचा जन्म टाळण्यासाठी किंवा गर्भावस्थेत लिंग ठरवून गर्भपात करण्यासाठी केल्या जातात, या समस्येचे मूळ कारण आहेत. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून गर्भातील लिंग ठरवणे, मग ते अवैध असले तरी, काही भागांत अजूनही चालू आहे. या प्रथेमुळे फक्त मुलींच्या जन्माला येण्याच्या संख्येत घट होत नाही, तर समाजात मुलींबाबतचा दृष्टिकोन, त्यांच्या मूल्याची कल्पना आणि लिंगसमानतेची स्थितीही ढासळते. मुलींचा जन्म सामाजिक आव्हान मानला जात-ो, कधी आर्थिक भार म्हणून, तर कधी सामाजिक मर्यादा आणि सांस्कृतिक रूढींच्या आधारे कमी महत्त्वाचा मानला जातो. ही प्रथा केवळ भारतापुरती मर्यादित नसून, काही अन्य आशियाई देशांमध्येही दिसून येते, मात्र भारतात तिचा सामाजिक आणि सांस्कृतिक प्रभाव विशेष स्पष्ट आहे. मुलींच्या जन्मावर असलेला आर्थिक आणि सामाजिक दबाव देखील यामागे मुख्य कारण आहे. लग्नाचा खर्च, मुलींच्या शिक्षणाचा भार, आणि मुलींच्या भविष्याबाबत असलेली सुरक्षिततेची चिंता यामुळे अनेक कुटुंब मुलींच्या जन्माला प्राधान्य देत नाहीत. या मानसिकतेत बदल करणे आणि मुलींचे मूल्य उंचावणे हे समाजाच्या प्रत्येक घटकावर अवलंबून आहे.

भारत सरकारने या समस्येवर नियंत्रण ठेवण्यासाठी कायदेशीर उपाययोजना उपाययोजना राबविल्या आहेत. झीश-उेपलर्शीेिप रपव झीश-छरींरश्र ऊळरस-पींिळल ढशलहपळींशी (PCPNDT) -ct, १९९४ ह्या कायद्याद्वारे गर्भावस्थेत लिंग निर्धारणावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. हा कायदा मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येतील असमानतेवर नियंत्रण ठेवण्याचा एक महत्त्वाचा आधार आहे. तथापि, काही ठिकाणी या कायद्याची अंमलबजावणी प्रभावीपणे नाही, ज्यामुळे लिंग निवडीच्या प्रथा काही प्रमाणात अजूनही चालू आहेत. त्यामुळे केवळ कायदे नाही तर समाजातील मानसिकतेत बदल आणणे गरजेचे आहे. मुलींचे शिक्षण, आरोग्य, पोषण आणि सुरक्षिततेची हमी देणे, त्यांच्या सामाजिक मूल्याची दखल घेणे आणि त्यांच्या विकासासाठी योग्य वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. उदा. हरियाणा राज्यातील पंचकुला जिल्ह्यात २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर सुधारले असून ते ९५१ वर पोहोचले आहे, जे २०२४ मध्ये ९१४ होते. या सुधारणामागे झउझछञ्ज कायद्याची कठोर अंमलबजावणी, चढझ कायद्याची अंमलबजावणी, जिल्हा प्रशासनाची समन्वयित कार्यवाही आणि जनजागृती मोहिमांचा मोठा वाटा आहे. पंचकुला प्रशासनाने १३७ झछञ्ज केंद्रांची, ४६ चढझ केंद्रांची आणि १५ इ-चड क्लिनिकांची तपासणी केली, ज्यामुळे लिंग गुणोत्तरात सुधारणा साधली गेली. तथापि, गाझियाबाद (उत्तर प्रदेश) येथे २०२५ मध्ये लिंग गुणोत्तर ८५३ वर खाली आले आहे, जे बेकायदेशीर गर्भपात केंद्रे आणि लिंग निवडीच्या प्रथांमुळे आहे. या ठिकाणी प्रशासनाने उपाययोजना राबवल्या असल्या तरी समस्या अजूनही गंभीर आहे.

यासोबतच सामाजिक उपाययोजनाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजना ही या दिशेने एक महत्वाचा उपक्रम आहे. या योजनेचा उद्देश मुलींच्या जन्माचे स्वागत करणे, त्यांचे शिक्षण सुनिश्चित करणे आणि लिंगभेद कमी करणे आहे. या योजनेअंतर्गत मुलींच्या आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सुरक्षिततेसाठी विविध कार्यक्रम राबवले जातात. शाळा, सामाजिक संस्था आणि स्थानिक समुदाय यामार्फत मुलींच्या हक्कांबाबत जनजागृती केली जाते. समाजात लिंगसमानतेबाबत मानसिकतेत बदल आणण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न आवश्यक आहेत. मुलींच्या विकासासाठी पालक, शिक्षक, प्रशासन आणि समाजाने एकत्रित काम करणे अत्यावश्यक आहे.

मुलींची जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही फक्त आकडेवारी किंवा सामाजिक प्रश्न नाही, तर त्याचा परिणाम देशाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक विकासावरही होतो. हा प्रश्न समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. लिंगभेदामुळे महिलांवरील हिंसा, लैंगिक छळ आणि समाजातील असमानतेची स्थिती अधिक वाढते. परिणामी, मुलींच्या सुरक्षिततेसाठी आणि समाजाच्या संतुलनासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. मुलींच्या जीवनात सकारात्मक बदल घडवणे, त्यांना समान संधी देणे, आणि लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे हेच खरे उद्दिष्ट असावे. मुलींचे योग्य स्वागत करणे, त्यांना शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षितता याची हमी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विरोध करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही, तर मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आरोग्य आणि लिंगसमानतेसाठी जनजागृतीचा दिवस आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे.

शेवटी, मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट ही केवळ आकडेवारी नाही, तर समाजाच्या नैतिकतेची, मूल्यांची आणि विकासाची परीक्षा आहे. मुलींच्या जन्माला येणाऱ्या संख्येत घट हा समाजातील लिंगभेद आणि मुलींबाबतच्या मानसिकतेचा स्पष्ट सूचक आहे. मुलींच्या सुरक्षिततेसाठी, शिक्षणासाठी आणि सामाजिक विकासासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय बालिका दिन हा केवळ उत्सव नाही; तो मुलींच्या सुरक्षितता, शिक्षण, आर-ोग्य, आणि लिंगसमानतेसाठी मुलींच्या अधिकारांसाठी जनजागृतीचा दिन आहे. मुलींचे योग्य स्वागत करणे, मुलींचा जन्म स्वागतार्ह असावा, त्यांना शिक्षण, पोषण आणि सुरक्षितता मिळावी, आणि लिंगभेदाचा पूर्णपणे विरोध केला जावा ही समाजाची जबाबदारी आहे. मुलींना शिक्षणाची आणि विकासाची संधी देणे, तसेच लिंगभेदाच्या सर्व प्रकारांना विर-ोध करणे हेच या दिवसाचे खर्या अर्थाने औचित्य आहे. या दिवसाच्या निमित्ताने प्रत्येक नागरिक, पालक, शिक्षक, प्रशासक आणि समाजातील घटक मुलींच्या हितासाठी, लिंगसमानतेसाठी आणि समाजाच्या नैतिक विकासासाठी प्रयत्नशील राहणे आवश्यक आहे. -

**डॉ. राजेंद्र बगाटे, (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# भारतात सर्वात जास्त दुर्लक्ष केले जात असेल तर ते मुलांच्या आरोग्याकडे......

भारतात सर्वात जास्त दुर्लक्ष केले जात असेल तर ते मुलांच्या आरोग्याकडे. त्यातही सरकारी संस्था असतील तर या दुर्लक्षाचे परिणाम फारच भयंकर होतात. देशात एकूणच आरोग्यावर सरकार केवळ वित्त वर्ष २०२६ च्या अर्थसंकल्पानुसार २ टक्के खर्च करते. ही आकडेवारी केवळ २०२६ ची आहे. त्यापूर्वी कितीतरी लोकांनी सरकारच्या आरोग्यावरील अपुऱ्या उपाययोजनेमुळे आपले प्राण गमावले असतील त्याची कल्पना करणे अशक्य आहे. पण काल मध्य प्रदेशमध्ये ९ आणि राजस्थानात २ जणांचा बळी याच कफ सिरपमुळे गेला आणि त्यानंतर सरकारी यंत्रणा खडबडून जागी झाली. मग कोल्ड्रिफ या कफ सिरपवर बंदी आणली गेली आणि हे विषारी किंवा कंटॅमिनेटेड कफ सिरपचे जाळे केवळ मध्य प्रदेश अथवा राजस्थानमध्येच नव्हते, तर त्याची व्याप्ती तामिळनाडूतही पसरली आहे असे लक्षात आले. या कोल्ड्रिफमध्ये डाय इथिलीन ग्लायकोल हा विषारी पदार्थ अत्यंत धोकादायक अवस्थेत आढळला. ज्याचे प्रमाण ४८.६ टक्के इतके होते. सहसा कोणत्याही कफ सिरपमध्ये या घातक पदार्थाचे प्रमाण जागतिक आरोग्य संघटनेकडून केवळ ०.१० टक्के इतके असण्यास मान्यता आहे. इतक्या जास्त प्रमाणात या पदार्थाची कफ सिरपमध्ये उपस्थिती ही त्याच्या घातकपणाची साक्ष आहे पण ते औषध देणाऱ्या डॉक्टर्सची कंपन्यांशी असलेली साठगाठ दाखवून देणारी आहे. आता केंद्र सरकार आणि मध्य प्रदेश सरकारने डॉक्टरांसाठी सल्लापत्र जारी केले आहे, की त्यांनी दोन वर्षांखालील मुलांसाठी तरी हे कफ सिरप आपल्या औषध योजनेत देऊ नये. पण हे उशिरा आलेले शह-ाणपण झाले. त्या आधी जी अकरा बालके दगावली त्यांच्या जिवांची कोण जबाबदारी घेणार हा प्रश्न तसाच आहे.

जी मुले या प्रकरणात दगा-वली आहे, ती गरीब किंवा मध्यमवर्गीय परिवारांतील आहे. त्यांच्या आईवडिलांकडे यंत्रणेला जाब विचारण्याची क्षमता नाही. त्यामुळे या असहाय्य आईवडिलांनी आपल्या मुलांच्या यमदूताकडे म्हणजे डॉक्टरांच्या कृत्यांकडे असहाय्यपणे पाहत बसावे का, असा प्रश्न उरतो. औषध तयार करणाऱ्यांनी आपल्या नैतिकतेशी तडजोड करत ही विषारी द्रव्य असलेली कफ सिरप विकली आहे. यंत्रणेविरोधात दाद मागण्याची सामान्य माणसात ताकद नसतेच त्यामुळे हे प्रकार चालतात. काही दिवस हे गाजेल आणि नंतर बासनात गुडांळून ठेवले जाईल. कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण असल्याची पुष्टी केली आहे. पण तामिळनाडूमधील उत्पादक कंपनीला इतक्या प्रमाणात हा विषारी पदार्थ वापरण्याची परवानगी कुणी व का दिली हा यातील महत्त्वाचा मुद्दा आहे. मध्य प्रदेशातील छिंदवाडा येथील सहा आणि राजस्थानातील दोन बालके या कफ सिरपमुळे दगा-वली. याला सरकारी यंत्रणा जबाबदार आहे, यात काही शंका नाही. भाजपची सरकारे असलेल्या राज्यात हे प्रकार झाल्याने तेथील यंत्रणा दोषी आहे, असा दावा कुणी केला तर त्यासारखे हास्यास्पद तोच असेल. पण या प्रकरणाची निष्पक्षपाती चौकशी करून दोषींना कठोर शिक्षा करायला हवी. आरोग्य मंत्रालयानेही पुष्टी केली आहे, की त्यांच्या तामिळनाडूमध्ये असलेल्या कोल्ड्रिफ या कफ सिरपमध्ये डाय इथिलीन ग्लायकोलचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे दोन वर्षांच्या आतील बालके या औषधामुळे दगावली आहे. पण केंद्र सरकारच्या चाचणीत असे आढळले आहे, की कोणतेही दूषित पदार्थ कफ सिरपमध्ये आढळला नाही. सीडीसीएसओने आपल्या ताज्या अह-वालात म्हटले आहे, की कोणत्याही कफ सिरपमध्ये असा कोणताही दूषित पदार्थ आढळला नाही. असे असले तरीही या ११ मुलांच्या मृत्यूची जबाबदारी कोणत्याही सरकारला टाळता येणार नाही. केंद्र सरकारने कफ सिरपला क्लीन चिट दिले असले, तरीही त्यामुळे लहान मुलांचे मृत्यू झाले हे सत्य नाकारता येणारे नाही. केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशांना कफ सिरपचा वापर करू नये म्हणून कडक आदेश दिले. राज्यांनी या विषयावर जी सतर्कता दाखवली आहे ती कौतुकास्पद आहे. कफ सिरपच्या उत्पादनावर हिमाचलमध्ये बंदी आण-ली आहे आणि तामिळनाडूत तर बंदी आहे. आपल्याकडे कफ सिरप अग-ोदर निरूपद्रवी औषध म्हणून उपयोगात आणले जात होते पण त्यानंतर झोपडपट्टीतील मुलांनी आणि कित्येक तरुणांनीही कफ सिरपचा मादक पदार्थ म्हणून वापर सुरू केला होता. त्यामुळेच त्याच्यावर आधीच बंदी होती.

सहा राज्यांत या कफ सिरपचे निरीक्षण करण्यात आले आणि त्यात दूषित पदार्थाचे प्रमाण वाजवीपेक्षा जास्त आढळले आहे. कफ सिरप हे फक्त खोकल्यावर दिले जाते आणि त्याचा उपयोग पुढे तरुणांकडून नशेसाठी केला जाऊ लागला. पण आता तर हे लहान मुलांचे बळी घेण-ारे ठरले आहे आणि ही चिंताजनक बाब आहे. त्यामुळे सरकारने जागरूक होऊन कफ सिरपच्या वापरावरच बंदी आणली आहे. कफ सिरपच्या वापरामुळे लोकांना विशेषतः बालकांना उच्च रक्तदाब, अनियमित हृदयाचे ठोके आणि मानसिक तसेच अस्वस्थ वाटणे असे परिणाम संभवतात. लहान बालके हे सांगू शकत नाही. त्यामुळे कित्येक तर मृत्यूला कवटाळतात. कधी-कधी या निरूपद्रवी वाटणाऱ्या कफ सिरप-चे परिणाम भयंकर ठरतात. त्यामुळे आता सरकारने जी कृती केली आहे ती अत्यंत स्वीकारार्ह आणि योग्य आहे. तसेच कोरड्या खोकल्यासाठी कफ सिरप डॉक्टर लिहून देत असत. पण आता केंद्र सरकारने जारी केलेल्या सल्लापत्रामुळे तसे होणार नाही आणि यापुढे तरी बालके सुरक्षित राहतील अशी आशा बाळगण्यास जागा आहे. अन्न आणि औषध प्रशासन यांनी १८ किंवा त्यापेक्षा लहान मुलांसाठी कफ सिरप सुरक्षित नाही असे लिहून दिले आहे. पण तरीही आपल्याकडे नशा किंवा अन्य कारणांसाठी हे कफ सिरपचे सेवन केले जाते. आता या कफ सिरपवर कडक बंदी आणली पाहिजे. लहान मुले जी गेली आहे त्यांच्या आत्म्यांचा तळतळाट त्यामुळे आता तरी लागणार नाही. छिंदवाडातील मृत बालकांच्या मृत्यूंची संख्या १२ वर पोहोचली असताना कोल्ड्रिफचे बळी ते असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे आता कोल्ड्रिफवर बंदी आली आहे, पण त्यांच्या शरिरांत विषारी पदार्थ असल्याचे आढळले आहे. ही निश्चितच भारताच्या आरोग्य क्षेत्रासाठी स्पृहणीय बाब नाही.

## मोहरा ग्रामपंचायत सरपंचाचा पुढाकार, ५० जलतरा प्रकल्प राबविला

## टँकर मुक्त गाव करण्यासाठी एकजुटीने गावाचा जलतारा व वृक्ष उपक्रम सुरु

**आत्ताच एक्सप्रेस कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम /** कन्नड तालुक्यातील मोहरा गा-वाचा पुढाकार टँकर मुक्त गाव कायमस्वरूपी करण्यासाठी घे-तला भव्य वृक्ष लागवड संगोपन उपक्रम हाती. मोहरा गावा-तील ३५ एकर ओसाड गायरान जमिनीवर दोन लाख ८० हजार रोपांची लागवड करण्याचा संकल्प केला असून आतापर्यंत अडीच लाख रोप लागवड झाली आहे. ७२ प्रकारची वृक्ष ला-गवड या ठिकाणी होत आहे तसेच ग्रामपंचायतला देखील यातून उत्पन्न मिळेल. संगोपनासाठी २.५ कोटी लिटर क्षमतेचे शेततळे तयार केले आहे.

याशिवाय ३५ एकर क्षेत्रासाठी तारेचे कुंपण केले असून सर्व लावलेल्या वृक्षांना संगोपनासाठी १००% ठिबक सिंचन व्यवस्था केली आहे. भविष्यात या ठिकाणी कोट्यवधी रुपये किमतीचा ऑक्सिजन या ठिकाणी तयार होण्यास सुरुवात होणार आहे.

मोहरा गावाच्या या भव्य पुढाकाराने प्रकल्पाने येथील विद्यार्थ्यांनी शिक्षकांनी श्रमदानातून या उपक्रमात मोल-ाचे योगदान देऊन हजारो रोपे वृक्षारोपण केली. या उपक्रमांचा प्रारंभ जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व एच डी एम संतोष गोरड ,तहसीलदार विद्याचरण कडवकर कन्नड यांच्या मार्गदर्शनातून झाला सरपंच समाधान गाडेकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामपंचायत सेवक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा प्रकल्प राबविला जात आहे. संपूर्ण महाराष्ट्र भर या मोहरा गावाचे कौतुक होत आहे.

सरपंच समाधान गाडेकर यांचे



औषधी वनस्पती देशी प्रजातीची झाडे फळे फुले लागवड केली असून बाराही महिने या ठिकाणी पशुपक्ष्यांसाठी फळे फुले राहतील अशा पद्धतीचे नियोजन केलेले पर्यावरणाच्या समृद्धीमध्ये भव्य अशी भर पडणार आहे. या उपक्रमामध्ये कै. पुंडलिकराव पाटील माध्यमिक विद्यालय व जिल्हा परिषद शाळा मोहरा मोलाचे योगदान आहे. याप्रसंगी दिल्लीचे काही पदाधिकाऱ्यांनी या गावाला विशेष भेट देऊन सर्वात मोठ्या वन प्रकल्पाचे कौतुक केले .

# पाणीपुरवठा योजनेतर्गत ग्रामपंचायतीतील विकासकामांची तातडीने चौकशी करून सर्व शासकीय निधी स्थगित करावा...

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी/बबन उदावंत** / पैठण तालुक्यातील चनकवाडी ग्रामपंचायत वॉटर फिल्टर, पाणीपुरवठा योजना आणि ग्रामपंचायतीतील विविध विकासकामांमध्ये झालेल्या अनियमिततेबाबत तातडीने चौकशी करून सर्व शासकीय निधी स्थगित करण्याची छावा महाराष्ट्र सेनेची मागणी.

चनकवाडी ग्रामपंचायत (ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर) येथे गेल्या काही काळात विविध शासकीय योजनांमध्ये गंभीर अनियमितता, भ्रष्टाचार आणि निधीचा गैरवापर झाल्याचे आढळून आले आहे.गावाच्या विकासाच्या नावाखाली बोगस कामे दाखवून लाखो रुपयांचा निधी उचलण्यात आला असल्याचा संशय नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

विशेषत: वॉटर फिल्टर व पाणीपुरवठा योजना संदर्भात मोठा गैरव्यवहार झाला आहे. जिल्हा परिषद शाळा शेजारी बसवलेला फिल्टर अनेक महिन्यांपासून (सुमारे ६ ते ७ महिने) बंद असून, मेरी ग्रामपंचायत ॲपवरील नोंदी याची पुष्टी करतात.प्रत्यक्षात काम न करता अंदाजे रु. १,४२,०००/- चे बोगस बिल दाखवून निधी उचलला गेला असल्याची शक्यता आहे.

याशिवाय, नाली बांधकाम, अंगणवाडी साहित्य खरेदी, स्मशानभूमी विकास, नळपाणी योजना, सार्वजनिक सुविधा इत्यादी अनेक कामांमध्येही भ्रष्टाचार झाल्याचे नागरिकांकडून निदर्शनास आले आहे.

***छावा महाराष्ट्र सेनेच्या ठाम मागण्या:***

१. चनकवाडी ग्रामपंचायतीतील सर्व विकासकामांची सखोल व स्वतंत्र चौकशी करण्यात यावी.

२. वॉटर फिल्टर, नळपाणी योजना व इतर कामांशी संबंधित सर्व बिले, अंदाजपत्रके व खर्च नोंदी मागवून लेखापरीक्षण करण्यात यावे.

३. चौकशी पूर्ण होईपर्यंत चनकवाडी ग्रामपंचायतीस कोणत्याही योजना (जिल्हा परिषद, पंचायत समिती, महाराष्ट्र शासन, केंद्र शासन इत्यादी) अंतर्गत मिळणारा निधी स्थगित करण्यात यावा.

४. दोषी आढळलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांवर आणि संबंधितांवर कठोर शासकीय कारवाई करण्यात यावी.

५. ही तक्रार माहितीत्सव (खपषी-रींळेप ऋशीींर्ळींरश्र) अंतर्गत नागरिकांच्या सहभागातून सादर करण्यात आली असून, चौकशी पूर्णपणे पारदर्शकपणे करावी.




६. चौकशी अहवाल सार्वजनिक करून सर्व संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी.

७. आपण केलेल्या चौकशी उलट टपाली अहवाल सादर करावा

जर प्रशासनाने या गंभीर भ्रष्टाचाराची दखल घेतली नाही, तर छावा महाराष्ट्र सेना महाराष्ट्र राज्य संघटना व गावकऱ्यांच्या वतीने पंचायत समिती पैठण येथे तीव्र प्रकारचे आंदोलन करण्यात येईल असे निवेदन गटविकास अधिकारी यांना देण्यात आले या वेळी छावा महाराष्ट्र सेनेचे प्रदेश सल्लागार किशोर सदावर्ते, प्रदेश सरचिटणीस रामेश्वर बावणे,मराठवाडा अध्यक्ष मनोज मुरदारे, जिल्हाप्रमुख साईनाथ कर्डिले,सदस्य गणेश गिरगे, प्रीतम आडसुल आदी उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना माजी खासदार समीर भुजबळ, यांच्या वाढदिवसानिमित्त फळ वाटप

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी/ सुभान शहा** / गंगापूर उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना सफरचंद केळी असे फळ वाटप करण्यात आले. माजी खासदार समीर भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त अखिल भारतीय महात्मा सार कोणत्याही प्रकारचा मोठा कार्यक्रम न ठेवता गंगापूर उप जिल्हा रुग्णालयातील रुग्णांना सफरचंद केळी असे फळे वाटप करून साधारण वाढदिवस साजरा करण्यात आलाा. यावेळी उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर कर्मचारी व अखिल भारतीय



फुले समता परिषद मित्र मंडळाच्या वतीने फळ वाटप करण्यात आले. कुठलीही बॅनरबाजी न करता व इतर खर्च न करता सध्याची परिस्थिती अतिवृष्टी झाली असल्यामुळे मा. खासदार समीर भुजबळांच्या आदेशानु- महात्मा फुले समता परिषद चे पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच गोपाल भड समता परिषद शहर अध्यक्ष, मोहन सोनवणे तालुका अध्यक्ष, बढो गायकवाड, ऊपर चेहरा दीक्षा, मौली पवार, अशोक रवि धारूंटे, उपस्थित होते .

# पिंपळवाडी (पि) येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेत मोठ्या थाटा माटात निरोप समारंभ संपन

**आत्ताच एक्सप्रेस**
**पिंपळवाडी प्रतिनिधि/हारुन/ शेख/** पैठण तालुक्यातील पिंपळवाडी (पि.)दि. ८ आक्टोबर वार बुधवार रोजी केंद्रीय प्राथमिक शाळा येथील उर्दू शाळेतील शिक्षक ईनुस पठाण,मुजाहीद त्यांची कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा निरोप समारंभ ठेवण्यात आला, शाळा समिति अध्यक्ष यांनी शिक्षकांचा शॉल ,नारळ, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा आदर सत्कार करण्यात आला.यावेळी मुख्याध्यापीका मदने मेडम, उर्दू शालेय समितिचे




शेख,आयेशा बाजी यांची शासकीय बदली झाली आहे. युनुस सर हे सरासरी १२ वर्ष तर मूजाहीद सर हे ७ वर्ष तर आयेशा बाजी या ८ वर्षापासुन या उर्दू शाळेत कार्यरत होते.यांनी आपल्या कार्यकालामध्ये विद्याार्थ्यांना अनेक सांस्कृतिक कार्यक्रम अनेक स्पर्धा स्कॉलरशिप्स साठी प्रोत्साहित केले त्यामुळे बर्याचशा विद्यार्थानी आपले ध्येय गाठले. अनेक विद्यार्थी अणि पालक त्यांचे ऋणी आहेत. अध्यक्ष हाफीज मकसुद अकबर, शेख, उपाध्यक्ष शौकत मौलाना, सदस्य जावेद शेख, सय्यद किफायतुल्लाह, अब्दुल रशीद अंसारी सर,फैसल बागवान सर,व शालेय विद्यार्थी इ.उपस्थित होते. त्यानंतर लगेच येणार्या नविन शिक्षकांचे उर्दू शालेय समितिचे अध्यक्ष हाफीज मकसुद अकबर शेख यांनी पुष्प गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले आणि त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# चिंचोली येथे कला महाविद्यालयात जागतिक आरोग्य दिन साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी/सुनिल निकम**/ कन्नड तालुक्यातील चिंच-ोली (लिं) येथील धारेश्वर शिक्षण संस्थेचे कला व विज्ञान महाविद्यालय येथे आज दिनांक १०/१०/२०२५ रोजी मानसशास्त्र विभागाद्वारे जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र चिंचोली (लिं) येथील डॉ. प्रद्युम्न आंबेकर व प्रशांत अभंग यांची प्रमुख उपस्थिती होती त्यांनी आजच्या युगात ज्याप्रमाणे इतर शारीरिक आजारासाठी आपण डॉक्टरांकडे जात असतो. त्याचप्रमाणे मानसिक आजार न लपवता आजाराचे लक्षणे दिसल्यास मानसिक आरोग्य केंद्रात जाणे गरजेचे आहे. योग्य आहार व्यायाम योगासने व प्राणायाम करून आपण आपले मानसिक आरोग्य चांगले ठेवू शकतो. प्रत्येक व्यक्तीने मानसिक आजाराबाबत सतर्क राहणे गरजेचे आहे.

मोबाईल मुळे ही अनेक प्रकारचे मानसिक आजार होऊ लागले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य प्रमाणात वापर करावा व मानसिक आजारापासून दूर राहावे असे सांगितले त्याचप्रमाणे धारेश्वर शिक्षण संस्थेचे संस्थापक निवृत्त शिक्षणाधिकारी डॉ. टी.पी.पाटील यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती, त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपल्या मनात जे विचार येत असतील ते विचार प्रगट करणे गरजेचे आहे कारण विचार जर मनात ठेवले तर त्याचे रूपांतर मानसिक आजारात होत असते. संवाद कमी होत चालला आहे कुटुंबात संवाद होणे गरजेचे आहे. भावनांचे प्रगटीकरण होणे गरजेचे आहे.



यामुळेच मानसिक आरोग्य चांगले राहू शकते असे मत मांडले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अनिता खंडागळे ह्या होत्या त्यांनी आपल्या अध्यक्षीय समारोप करताना अनेक उदाहरणे देऊन मानसिक आरोग्य कसे जपता येईल हे सांगितले त्याचप्रमाणे आजीवन शिक्षण विस्तार विभागाचे समन्वय डॉ.विक्रमसिंह पवार यांनी आजीवन शिक्षण विस्तार विभागाद्वारे महाविद्यालयात कोणते कोणते कोर्स राबविले जातात याची माहिती विद्यार्थ्यांना करून दिली.जागतिक मानसिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने जागतिक आत्महत्या प्रतिबंध दिनानिमित्त पोस्टर प्रेसेंटेशन स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामध्ये प्रथम क्रमांक माधुरी भुजंग द्वितीय क्रमांक कल्पना दिवटे व तृतीय क्रमांक यो-गेश मनगटे या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. उमाकांत गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ रामेश्वर राऊत यांनी करून दिले तर आभार प्रदर्शन विद्यार्थिनी कु.सायली बिलंगे हिने केले. याप्रसंगीप प्राध्यापक, सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गंगापूर नगरपरिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवास योजनेचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे तसेच कासव गतीने- राहुल वानखेडे

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी** / गंगापूर नगरपरिषदेअंतर्गत गंगापूर शहरा-तील लासूर रोडवरील गायरान जमिनीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पंतप्रधान आवास योजनेतुन सर्वांसाठी घरे योजनेंअंतर्गत ५९१ घरकुलांचा भव्य प्रकल्प योजनेच्या प्रत्यक्ष कामाचा शुभारंभ २०२० मध्ये सुरु करण्यात आला होता सदर घरकुल योजनेतील सर्व घरे बांधकाम करण्यासाठी समरथ मल्टीबीज इंडिया प्रा. ली. गारखेडा परिसर औरंगाबाद या कंपनीला ठेका देण्यात आला आहे.

सदर समरथ मल्टीबीज इंडिया प्रा. ली. या कंपनीने अत्यन्त धिम्या गतीने घरकुल बांधकामास सुरवात केली होती हे काम सद्यस्थितीतही कासवगतीने चालू असून सदर कंपनीला बांधकामाचे बिल देयके अदा करताना म्हणजेच देताना गंगापूर नगरपालिका प्रशासनाने नियमाची पायमल्ली केली असून एकूण आतापर्यंत झालेल्या बांधकामापेक्षा पाच पट जास्त बिल देण्यात आलेले आहे सदर बिल देताना तात्कालीन प्रभारी मुख्याधिकारी/ प्रशासक नंदकिशोर भोंबे हे होते व सर्वात महत्वाची बाब म्हणजे तात्कालीन वेळी गंगापूर नगरपरिषदेला लेखाधिकारी अकाउंटंट हजर नसताना नसताना नगरपालिकेतील लिपिक प्रशांत लांडे यांनी सदर घरकुल योजनेचे बांधकामा पेक्षा जास्तीचे एकूण ३ कोटी ५४ लाख रुपयाची बनावट बिले स्वतः बनवले व तात्कालीन मुख्याधिकारी नंदकिशोर भोंबे यांच्या आदेशाने सदरील समरथ मल्टीबीज कंपनीला अदा केले, व सदरील योजनेबाबत आता गंगापूर नगरपरिषद माहिती देण्यास टाळाटाळ करत आहे. एकूणच गंगापूर नगरपरिषदेतील मुख्याधिकारी व कर्मचारी व सदरील कंपनीने संगनमत करून एकूण कामाच्या पाचपट जास्त बनावट बिले तयार करून या



घरकुल योजनेत कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार केला.

तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचना वतरतुदी व नियामवाली याची पूर्णतः पायमल्ली करण्यात आली आहे तसेच या योजनेत भ्रष्ट्राचार करून गोरगरीबांच्या घरकुल योजनेचा पैसा लाटला आहे.

या संदर्भात दिनांक १३/०९/२०२३ रोजी कारवाईसाठी तात्कालिक जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले परंतु कुठलीही कारवाई जिल्हाधिकारी यांनी अद्यापही केलेली नाही.

सदरील घरकुल योजनेत आर्थिक गैरव्यवहार करणाऱ्या समरथ मल्टीबीज इंडिया कंपनी व संबंधित अधिकारी व कर्मचारी यांची चौकशी व सदरील योजने-तील बांधकामापेक्षा जास्त ३ कोटी५४ लाख रुपये दिलेल्या बनावट बिलाची चौकशी करून कडक कारवाई करण्यात यावी अशीही मागणी समाजसेवक राहुल वानखेडे यांनी वारंवार लेखी निवेदनद्वारे केली आहे मात्र अद्यापही नगरपालिका, जिल्हापरिषद, जिल्हाधिकारी यांनी केलेली नाही त्यामुळे गरिबांच्या घरकुलावर डल्ला मारण्याचे काम संगनमतीने चालू आहे.

असाही आरोप राहुल वानखेडे यांनी केला आहे...

# हंबरडा मोर्चाच्या तयारीसाठी सावळदबारा सर्कलची बैठक घेण्यात आली

**आत्ताच एक्सप्रेस**
**सावळदबारा प्रतिनिधी/** छत्रपती संभाजीनगर येथे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे गुलाबराव पाटील कोलते यांनी सावळदबारा सर्कल मधील बैठक घेण्यात आली होती

दि. १० ऑक्टोंबर रोजी सकाळी सावळदबारा येथील येथे बैठक घेण्यात आली होती यावेळी शेतकरी व ग्रामस्थ हजर होते .

यावेळी दिनकर शिपल्कर, एकनाथ सपाटे, शेषराव




यांच्या नेतृत्वात निघणाऱ्या हंबरडा मोर्चाच्या तयारीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सोयगाव तालुका संघटक शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सोयगाव तालुका संघटक गुलाबराव पाटील कोलते यांच्या संपर्क कार्यालय पाटील,सखाराम कोते, समाधान कपाटे, प्रकाश गायकवाड, ताराचंद जाधव, गजानन अंभोरे, आदी होते.

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
आत्ताच एक्सप्रेस
जालना
शनिवार ११ ऑक्टोबर २०२५


# संक्षिप्त

## दिव्यांग लाभार्थींसाठी शिबीराचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाकडून संजय गांधी निराधार योजनेतील दिव्यांग लाभार्थींचे मासिक अर्थसहाय १ हजार ५०० रुपयांवरुन २ हजार ५०० रुपये करण्याच्या अनुषंगाने जालना शहरातील दिव्यांग लाभार्थ्यांची यादी तहसील कार्यालयातील नोटीस बोर्डवर डकविण्यात आली आहे. दिव्यांगासाठी मंगळवार दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जालना तहसील कार्यालयात शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी शिबीरात ऑनलाईन दिव्यांग प्रमाणपत्र, युडीआयडी कार्ड, अद्यावत आधारकार्ड व बँक पासबुकाच्या छायांकित प्रतिसह हजर रहावे, असे आवाहन तहसीलदार छाया पवार यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

## पोलीस पाटील भरती परीक्षेच्या उपकेंद्रावर प्रतिबंधात्मक आदेश लागू

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / जिल्ह्यातील सर्व उपविभागातील पोलीस पाटील संवर्गातील रिक्तपदे भरण्यासाठीच्या पदभरतीची लेखी परीक्षा दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ ते १२.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. जालना शहर परिसरातील एकुण २४ परीक्षा केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. तरी परीक्षा उपकेंद्राच्या २०० मीटर परिसरात कायदा व सुवस्था राखण्यासाठी प्रतिबंधात्मक कार्यवाही म्हणून भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागु करण्यात आला आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्राप्त झालेल्या शक्तीचा वापर करुन पोलीस पाटील भरती लेखी परीक्षेच्या २४ उपकेंद्राच्या २०० मीटर परिसरात परीक्षेच्या दिवशी सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी बुथ, फॅक्स, झेरॉक्स केंद्र व ध्वनी क्षेपके बंद ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक आदेश लागू करण्यात आला आहे. आदेशाच्या अंमलबजासाठी नोटीस देण्यासाठी पुरेसा कालावधी नसल्याने व परीक्षा सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ (२) नूसार आदेश एकतर्फी काढण्यात आला आहे. आदेश दि.१२ ऑक्टोबर २०२५ रोजी अंमलात राहील, असेही आदेशात नमुद करण्यात आले आहे.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजनेविषयी आवाहन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / महिला व बालविकास विभागाअंतर्गत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, जालना या कार्यालयाकडुन क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बाल संगोपन योजना राबविण्यात येते. योजनेअंतर्गत अनाथ, निराधार, एकल पालक, दुर्धर आजाराने बाधीत पालकांची बालके, कैद्यांची मुले, दिव्यांग बालके, अंध, मतीमंद, बालके यांना सदर योजनेअंतर्गत बाल कल्याण समितीच्या शिफारसीनुसार २ हजार २५० रुपये दरमहा लाभ दिला जातो. अर्जदाराने अर्ज त्रयस्थ व्यक्तीमार्फत न सादर करता स्वत: जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय जालना प्रशासकीय इमारत तळमजला जालना या ठिकाणी सादर करावा. तसेच सदर योजनेसाठी कार्यालयाकडुन कोणतेही शुल्क आकारण्यात येत नसुन सदर योजना मोफत पुरविण्यात येते.याबाबत कुणाची आर्थिक फसवणुक झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही यांची सर्व संबंधीत लाभार्थींनी नोंद घ्यावी असे अवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

# गटप्रवर्तक व आशा कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी जिल्हा परिषदेसमोर निदर्शने....

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / सिटू सलग्न गटप्रवर्तक - आशा कर्मचारी फेडरेशन च्या वतीने जिल्हा परिषद समोर गटप्रवर्तक व आशा यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी निदर्शने करण्यात आली व संबंधित मागण्याचे निवेदन जिल्हा आरोग्य अधिकारी श्रीमती भुसारे मॅडम यांना देण्यात आले. त्या निवेदनात म्हटले की,राज्यात राष्ट्रीय आरोग्य अभियानात सुमारे ३५०० पेक्षा अधिक गटप्रवर्तक व सत्तर हजारापेक्षा अधिक आशा स्वंयसेविका कार्यकत आहेत. आरोग्य विभागाचा कणा म्हणून त्यांना संबोधले जाते. गटप्रवर्तक व आशा स्वंयसेविकांचा प्रपंच त्यांच्या मानधनावरच अवलंबून आहे. माहे जून २०२५, जुलै २०२५ व ऑगस्ट २०२५, सप्टेंबर २०२५ या ४ महिन्याचे त्यांचे मानधन अद्याप झालेले नाही. त्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. काम करुनही मानधन चार-चार महिने प्रलंबित असल्यामुळे त्यांना घर चालवणे कठीण झाले आहे. बहुतांश गटप्रवर्तक व आशा स्वंयसेविकांवर संपूर्ण कुटूंबाची जिम्मेदारी आहे. तसेच गटप्रवर्तकांना दौरे करण्यासाठी हातात पैसे शिल्लक न राहिल्यामुळे कोणाकडून तरी उसनवारी पैसे घेवून दौर्‍याचा खर्च भागवावा लागत आहे.




गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांच्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांचे दरमहा ५ तारखेपर्यंत केंद्र व राज्य शासनाचे एकत्रित व नियमित दरमहा मानधन देण्यात यावे.,

गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना मातृ ऍप वर ऑनलाईन कामे करण्याची सक्ती करण्यात येऊ नये., अंगणवाडी सेविकांच्या धर्तीवर गटप्रवर्तक व आशा स्वयंसेविकांना ५ हजार रुपये दिवाळी भेट दिवाळीपूर्वी देण्यात यावी.,

गटप्रवर्तकांना जिओ टॅगची सक्ती करण्यात येऊ नये, मानधनाचे पगार पत्र देण्यात यावे, अंगणवाडी कर्मचाऱ्याप्रमाणे किरकोळ रजा व सणाच्या सुट्ट्या दिल्या पाहिजेत., आशा व गटप्रवर्तक यांच्या सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करण्यात यावे, आशा व गटप्रवर्तक यांना शासकीय दर्जा देऊन सरकारी कर्मचाऱ्यांच्या सोयी सवलती देण्यात याव्या., या मागण्यांसह इतर मागण्या संदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली., मागील चार महिन्याचे मानधन दिवाळीपूर्वी देण्याचे श्रीमती भुसारे यांनी मान्य केले. तसेच इतर शासन पातळीवर मागण्या संदर्भात शासनाकडे पाठपुरावा करण्यात येईल अशा आश्वासन देण्यात आले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष कॉम्रेड अण्णा सावंत, सिटू चे जिल्हाध्यक्ष मधुकर मोकळे संघटनेच्या जिल्हासचिव सरिता शर्मा, सिटू चे जिल्हासेक्रेटरी ड.अनिल मिसाळ, दीपा रगडे, कल्पना मिसाळ, कुशिव्रता डापके,बेबी शेख,सुजाता छडीदार,अनिता सोनवणे,आशा जगताप,ज्योती राठोड,रेखा गाडेकर,अश्विनी झोल,वनिता कपाळे,अनिता बनकर यांच्यासह गटप्रवर्तक व आशा मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जिल्हा परिषद-पंचायत समिती आरक्षण सोडत

### सोमवार १३ ऑक्टोबर रोजी होणार सोडत

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालनाप्रतिनिधी**/ राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांनी जिल्हा परिषद - पंचायत समिती निवडणूकासाठी आरक्षण सोडत कार्यक्रम जाहिर केला आहे. त्यानुसार सोमवार, दि. १३ ऑक्टोबर, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हा नियोजन सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे जिल्हा परिषद निवडणूक विभागासाठी अनुसूचित जाती (महिला), अनुसूचित जमाती (महिला), नागरिकांचा मागास प्रवर्ग (महिला) व सर्वसाधारण (महिला) यांच्याकरिता आरक्षण सोडत होणार असल्याचे नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी (सामान्य) यांनी कळविले आहे.

## घनसावंगी वकील संघाच्या अध्यक्षपदी ड.अंबर मते .तर सचिव पदी ड. गजेंद्र तांगडे यांची बिनविरोध निवड

**आत्ताच एक्सप्रेस**

**घनसावंगी प्रतिनिधी**/ घनसावंगी येथील वकील संघाच्या अध्यक्षपदी ड. अंबर काशिनाथ मते यांची बिनविरोध निवड होऊन नव्या कार्यकारिणीचा ताबा घेण्यात आला आहे. या निवडीमुळे वकिली क्षेत्रात कार्यरत असलेल्या विधीज्ञांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, नव्या नेतृत्वाकडून संघाच्या सर्वांगीण प्रगतीची अपेक्षा व्यक्त होत आहे.घनसावंगी वकील संघाची मागील कार्यकारिणीची मुदत संपल्याने नव्या कार्यकारिणीची निवड प्रक्रिया हाती घेण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ड. विठ्ठल उडाण आणि ड. सतीश देवडे पाटील यांनी संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा जाहीर केली होती. अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव आणि कोषाध्यक्ष या पदांसाठी प्रारंभी अनेक विधीज्ञांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल केले होते. मात्र, ९ ऑक्टोबर २०२५ रोजी झालेल्या वकील संघाच्या सर्वसाधारण सभेत सर्व सदस्यांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरणात एकमत निर्माण झाले. परिणामी, कोणतीही निवडणूक न लागता कार्यकारिणी बिनविरोध निवडून आली. या निवडीत अध्यक्षपदी ड. अंबर काशिनाथ मते, उपाध्यक्ष ड. एकनाथ देवडे, सचिव ड. गजेंद्र तांगडे, सहसचिव ड. सचिन चव्हाण आणि कोषाध्यक्ष ड. श्यामसुंदर तांगडे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. नव्या कार्यकारिणीने विधीज्ञांच्या हितासाठी राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये सातत्य ठेवण्याची व संघ अधिक सक्षम आणि एकत्रित करण्याची ग्वाही दिली आहे.यानिमित्ताने आयोजित सत्कार समारंभात नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी सर्व सन्मानिय वकील संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने विधीज्ञ मंडळी उपस्थित होती.



नव्या कार्यकारिणीच्या निवडीमुळे घनसावंगी वकील संघात नवी उमेद निर्माण झाली असून, एकजुटीने संघटित आणि समाजाभिमुख वकिली हा ध्यास घेऊन नव्या नेतृत्वाने कामाला प्रारंभ केला आहे.

## वीज कर्मचाऱ्यांच्या आंदोलनास भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची भेट

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना प्रतिनिधी** / महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित (चडएऊड), वीज निर्मिती (महानिर्मिती) व वीज पारेषण (महापरेषण) कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनी राज्य शासनाच्या वीज कंपन्यांचे खाजगीकरण करण्याच्या निर्णयाविरोधात सुरू केलेल्या आंदोलनास आज (दि.१०) रोजी भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी भेट देऊन कर्मचाऱ्यांची भेट घेतली व त्यांच्या मागण्यांची सविस्तर माहिती जाणून घेतली.



या वेळी श्री.दानवे यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना सांगितले की, वीज सेवा ही जनतेच्या जीवनाशी थेट निगडित असून, कर्मचाऱ्यांच्या योग्य मागण्या शासनापर्यंत पोहोचवण्यासाठी मी स्वतः प्रयत्न करील व वीज कंपन्यांतील अधिकारी, अभियंते व कर्मचारी यांनी केलेली मागणी लक्षात घेता या मागणीवर सकारात्मक तोडगा निघावा यासाठी मी मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस यांच्याशी चर्चा करून भेट घडून आणण्यासाठी प्रयत्नशील राहील असे आश्वासन त्यांनी दिले.

या वेळी श्री. दानवे यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधताना सांगितले की, वीज सेवा ही जनतेच्या जीवनातील अत्यावश्यक सेवा असून, शासन व वीज कर्मचारी दोघेही जनतेच्या हितासाठीच कार्यरत आहेत. कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासनापर्यंत योग्य मार्गाने पोहोचविण्यासाठी मी निश्चित प्रयत्न करीन असा विश्वास त्यांनी व्यक्त केला तसेच मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस हे जनहिताचा विचार करून निश्चितच योग्य निर्णय घेतील,

या भेटीदरम्यान अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. आंदोलन शांततापूर्ण आणि अनुशासित पद्धतीने सुरू असून शासनाने तातडीने योग्य निर्णय घ्यावा अशी अपेक्षा कर्मचाऱ्यांनी व्यक्त केली. आंदोलनस्थळी भाजपा उपाध्यक्ष श्री. सिद्धिविनायक मुळे, श्री.शशिकांत घुगे ,श्री. देवीदास देशमुख, ग्रामीण तालुकाध्यक्ष श्री.संजय डोंगरे.

# आपले सरकार' तक्रारीची चौकशी ठरली केवळ 'कागदी घोडा*'!

***कुक्कडगाव ग्रामपंचायत चौकशीत फक्त औपचारिकता; प्रत्यक्ष पाहणी, ग्रामसभा नोंदींचा पुरावा दुर्लक्षित***

***दोषींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न? चौकशी* *अधिकाऱ्यांकडून दप्तर हस्तगत***




**आत्ताच एक्सप्रेस**

**सुखापुरी प्रतिनिधी**/अंबड तालुक्यातील कुक्कडगाव ग्रामपंचायत येथील 'आपले सरकार' पोर्टलवर दाखल झालेल्या गंभीर तक्रारीच्या चौकशीसाठी आलेले अंबड पंचायत समितीचे चौकशी तथा विस्तार अधिकारी चव्हाण साहेब यांची संपूर्ण प्रक्रिया केवळ औपचारिकतेच्या चौकटीत अडकलेली नाटकबाजी ठरल्याचे स्पष्ट झाले आहे. तक्रारदारांनी उपस्थित केलेल्या एकाही गंभीर मुद्यावर प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी न केल्यामुळे, दोषींना पाठीशी घालण्याचा हा प्रयत्न असल्याची चर्चा गावात रंगली आहे.

***वित्त आयोगाच्या कामांची पाहणी टाळली***

तक्रारदार यांनी वित्त आयोगाच्या निधीतून झालेल्या कामांमध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याचा आरोप केला होता. नियमानुसार, चौकशी अधिकाऱ्यांनी जागेवर प्रत्यक्ष पाहणी करून कामांची गुणवत्ता तपासणे अपेक्षित होते. मात्र, अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयातच बसून केवळ तक्रारदारांचे म्हणणे कागदावर नोंदवले आणि काही सह्या घेऊन चौकशी पूर्ण केल्याचा आव आणला. गावकऱ्यांच्या मते, ही चौकशी म्हणजे 'गावात न येताच फाइलवर ठोकून दिलेली शिक्कामोर्तब चौकशी' आहे.

***ग्रामसभांच्या नोंदींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष***

तक्रारीतील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे सन २०२० ते २०२५ दरम्यान गावात एकही ग्रामसभा झालेली नाही. या लोकशाही प्रक्रियेलाच धक्का देणाऱ्या आरोपाच्या पडताळणीसाठी ग्रामपंचायतीचे दप्तर आणि ग्रामसभांच्या 'प्रोसीडिंग्स' (नोंदी) तपासणे अत्यावश्यक होते. परंतु, अधिकाऱ्यांनी ही नोंदी तपासण्याची तसदीही घेतली नाही, ज्यामुळे लोकशाही प्रक्रियेकडे दुर्लक्ष केल्याचा ग्रामस्थांचा थेट आरोप आहे.

***एक कोटी खर्चूनही पाण्याचा प्रश्न कायम*!**

गावात जलजीवन मिशन आणि जलस्वराज्य योजना व वित्त आयोगाच्या निधीतून अशा प्रकल्पांवर जवळपास एक कोटी रुपयांचा खर्च केला गेला आहे. तरीही गावकऱ्यांना आजही पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे. यावर चौकशी अधिकारी चव्हाण साहेबांनी केवळ तोंडी उत्तर देत 'आम्ही तपास करू' असे आश्वासन दिले; मात्र प्रत्यक्ष चौकशी शून्यच राहिली. *तसेच, रोजगार सेवक राजकीय पक्षाचे काम करतो त्यामुळे शासकीय योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचत नाही, या गंभीर आरोपाची थेट पडताळणी करण्याचेही अधिकाऱ्यांनी टाळले.

***दोषींना अभय की कारवाई*?**

***संभ्रम कायम***

प्रत्यक्ष पाहणी न करता, महत्त्वाचे दस्तएवज न तपासता आणि गंभीर आर्थिक आरोपांवर कारवाई न करता चौकशी पूर्ण झाल्याने, गावकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. ही चौकशी म्हणजे दोषींना आच्छादन देण्यासाठी रचलेले नाटक आहे. अधिकारी चौकशीसाठी आले की तक्रारी दाबण्यासाठी? या 'कागदी चौकशी'मुळे ग्रामस्थ व तक्रारदारांत संभ्रम निर्माण झाला आहे. दरम्यान, चौकशी अहवालाबाबत विचारणा केली असता, चौकशी अधिकारी चव्हाण साहेब यांनी ग्रामपंचायतचे दप्तर हस्तगत केले असून, आठ-दहा दिवसांत तपासणी करून अहवाल सादर केला जाईल, असे आश्वासन दिले आहे. मात्र, ग्रामपंचायतीच्या कारभारातील अनियमितता आणि चौकशीतील उथळपणामुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून सखोल व निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# सांबा उपविभाग यांनी राज्य मार्गावर २५१५ हेड वापरुन ३३ लाखाचा भ्रष्टाचार केल्याचा आरोप - लोणीकर

### वरिष्ठ अधिकाऱ्याच्या चौकशीच्या पत्राला कचऱ्याचे टोपले.....



**आत्ताच एक्सप्रेस**

**आष्टी प्रतिनिधी** / परतूर तालुक्यातील ३०५४ या हेड मधील झालेल्या बोगस कामाची तक्रार देऊन देखील कुठल्याही प्रकारची संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी झालेली नाही. विशेष म्हणजे राज्य मार्गावर सां बा उपविभाग परतूर यांनी २५१५ चे हेड मध्ये जे किलोमीटर होते तेच किलोमीटर वर कामे दाखवून ३०५४हेड वरती कामे न करता दाखवून २५१५ ग्रामविकास वरून ३३ लाख रुपये कामे न करता उचलण्यात आले आहेत.

या संदर्भात वारंवार आपल्या कार्यालयात पत्र व्यवहार केलेला आहे. या सोबत सर्व तांत्रिक मान्यतेची प्रत जोडलेली आहे.रा मा २५३ ते सातोना आष्टी रस्ता प्रजिमा -३६ कि मी ०/००ते०४/०० रस्त्याची सुधारणा करणे ता. परतूर जि. जालना रुपये ०२,९९,४३०/- पांडेपोखरी ते आसनगाव रामा ६१ कोकाटे, हादगाव, पिंपरी, धामणगाव, सावरगाव रस्ता प्रजिमा-३० किमी ०/०० ते ०४/५०० (संकिर्ण किमी ०७/५०० ते ११/३५०या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९९,०८०/-दैठणा, माव, पांडेपोखरी ते रामा ६१, रस्ता प्रजिमा ४९ कि.मी.०२/०० ते ४/५०० व ०९५००ते ११/५०० संकिर्ण कि.मी. ००/०० ते ०० ते ०२/००) रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९८,७६०/- रा मा २५३, ते सातोना आष्टी रस्ता प्रजिमा ३६ कि.मी.१७/०० ते २०/००या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९६.५४०/-कुंभार पिंपळगाव रामा २२३, गुंज सावरगाव, संकनपुरी ते लोणी फाटा रस्ता प्रजिमा ३१, कि.मी. २०/५०० ते २५/५०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२.९६,८६०/- रामा-२५३, ते सातोना आष्टी रस्ता प्रजिमा ३६ कि.मी. १४/००ते१७/००या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९९,०८०/- अहमदनगर शेगाव, पैठण, पाचोड, आंबड, पाथरी रस्ता रामा ६१, कि.मी. २०२/०० ते २०८/०० (संकिर्ण कि.मी. २०५/०० ते २०८/००) या रस्त्याची

रुपये सुधारणा करण्यासाठी ०२,९६,८००/- कुंभार पिंपळगाव रामा-२२३, गुंज, सावरगाव, संकनपुरी, ते लोणी फाटा रस्ता प्रजिमा ३१.कि.मी.१७/५०० ते २०/५०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९७,९२०/-अहमदनगर, शेगाव, पैठण, पाचोड, आंबड, पाथरी रस्ता रामा-६१, कि.मी. २०२/००ते २०८/०० (संकीर्ण कि.मी. २०२/०० ते २०५/०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९७,७००/- पांडेपोखरी ते आसनगाव रामा-६१, कोकाटे हादगाव, पिंपरी, धामणगाव, सावरगाव, रस्ता प्रजिमा ३०, किमी ०/००ते०४/५०० संकीर्ण किमी ०४/५०० ते ०७/५०० या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९८,७००/-कुंभार पिंपळगाव रामा-२२३ गुंज सावरगाव, संकनपुरी, ते लोणी फाटा रस्ता प्रजिमा ३१, कि.मी.१३/५०० ते १७/५००या रस्त्याची सुधारणा करण्यासाठी रुपये ०२,९७,९२०/- लेखाशीर्ष २५१५ नमुद आहे. सविस्तर माहिती हि त्या त्या तांत्रिक मान्यतेनुसार त्यात स्पष्ट उल्लेख आहे. वरील विषयाची चौकशी करून २५१५हे हेड राज्य मार्गाला वापरता येते का. याची माहिती घ्यावी ग्राम विकास यांचे २५१५, हे हेड सार्वजनिक बांधकाम उपविभाग परतूर यांनी राज्य मार्गाला वापरून कामे न करता निधी उचलण्यात आलेला आहे .

संबंधित अधिकारी यांनी राज्य रस्त्यावर २५१५ निधी वापरल्यामुळे त्यांची चौकशी करून त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. नसता मी विजय लोणीकर यांनी अमर उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813